| | | |
|---|---|---|
| | **जनसंपर्क अधिकारी**<br>**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार**<br>**पोलीस आयुक्त यांचेकार्यालय**<br>रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोननं ०२२- २९४५१००१<br>Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |


**प्रेसनोटक्र. २७१ - २३** **दिनांक २१/०८/२०२३**

# मोक्कातील अटक आरोपी सराईत गुन्हेगार गिरीश नायर याला ६ दिवसांची पोलीस कोठडी

दिनांक २०/०६/२०२३ रोजी नायगाव पोलीस ठाणे हद्दीमध्ये असलेल्या श्री जितेंद्र रमाकांत यादव यांच्या बिंधशक्ती रियल इस्टेट अँड इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई-अहमदाबाद महामार्ग येथील कार्यालयामध्ये सराईत गुन्हेगार गिरीश कुमारन नायर व त्याच्या अन्य साथीदारांनी येऊन जमिनीचा वाद सोडविण्यासाठी एक कोटी रुपयांची खंडणी मागितली होती व सदरची खंडणी न दिल्यास त्यास जीवे ठार मारण्याची धमकी दिली होती. त्यानंतर दुसऱ्या दिवशी गिरीश नायर याने त्याचे साथीदारांसह हातामध्ये तलवार, रॉड घेऊन येऊन जितेंद्र यादव यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांवर तलवारीने वार करुन जीवे ठार मारण्याच्या प्रयत्न केला तसेच कार्यालयासमोर असलेल्या दोन वाहनांच्या वाहनांची तोडफोड करुन दहशत पसरवून फिर्यादी जितेंद्र यादव यांना देखील जखमी केले होते. सदर घटनेबाबत नायगाव पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक १५५/२०२३ भा.द.वी.सं. कलम ३०७, ३८६, ३२४, ४५२, १४३, १४७ इत्यादी कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयातील मुख्य आरोपी गिरीश नायर हा सराईत गुन्हेगार असून त्याच्याविरुध्द यापूर्वी मुंबई शहर, ठाणे शहर व वसई-विरारमध्ये गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल असल्याने पोलीस उपायुक्त परिमंडळ-२ श्रीमती पौर्णिमा चौगुले-श्रींगी यांनी सदर गुन्हयाचा सखोल तपास करुन आरोपी गिरीश नायर याच्यावर यापूर्वी दाखल असलेल्या गुन्हयांची सविस्तर माहिती गोळा करण्याबाबत नायगाव पोलीस ठाणेच्या तपास पथकाला दिले होते. त्या अनुषंगाने श्री रमेश भामे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, नायगाव पोलीस ठाणे यांनी आरोपी गिरीश नायर व त्याचे साथीदारांवर दाखल असलेल्या मागील १० वर्षातील दाखल असलेल्या ९ गुन्हयांची माहिती तपास पथकाच्या मार्फतीने गोळा करुन सदर आरोपीवर व त्याचे साथीदारांवर महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मोक्का) अंतर्गत कारवाई करण्यात यावी याबाबत मा. श्रीकांत पाठक, अप्पर पोलीस आयुक्त मिरा-भाईंदर, वसई-विरार यांना अहवाल सादर केला असता त्यास मंजुरी मिळाल्याने सदर गुन्हयास मोक्कांतर्गत कारवाई करण्यात आली आहे. सराईत आरोपी गिरीश नायर हा गुन्हा दाखल झाल्यापासून अटकेपासून स्वत:च्या बचाव व्हावा यासाठी स्वत:चे अस्तित्व लपवून पळून राहत होता. त्याबाबत तपासी अधिकारी श्रीमती पद्मजा बढे, सहाय्यक पोलीस आयुक्त, वसई विभाग यांना गोपनीय माहिती मिळाल्यावरुन वरिष्ठांच्या मार्फतीने नायगाव पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी अंमलदार व

गुन्हे शाखेच्या संयुक्त पथकाने सापळा रचून त्यास १८/०८/२०२३ रोजी तपास पथकाने गोरेगाव मुंबई येथून ताब्यात घेवून त्यास अटक करण्याल आली होती.

अटक आरोपी गिरीश नायर यास दिनांक १९/०८/२०२३ रोजी मा. न्यायालयात हजर करुन महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मोक्का) अंतर्गत सविस्तर तपास करण्याकरिता पोलीस कोठडी मागण्यात आली असता त्यास दिनांक २५/०८/२०२३ रोजी पावेतो न्यायालयाने पोलीस कोठडी मंजूर केली आहे. आरोपी गिरीश नायर हा सराईत गुन्हेगार असून सामान्य नागरिकांमध्ये त्याच्याबद्दल दहशत असल्याने त्याच्याविरुध्द पोलीस ठाणेला कोणी सामान्य नागरिक तक्रार देण्यास धजावत नाही. त्यामुळे सदर आरोपीबाबत कोणास काहीएक सांगायचे असल्यास त्यांनी पोलीसांशी संपर्क साधावा याबाबत पोलीस उपायुक्त श्रीमती पौर्णिमा चौगुले-श्रिंगी यांनी जनतेला आवाहन केले आहे.

सदरची कामगिरी श्रीमती पौर्णिमा चौगुले श्रींगी, पोलीस उपायुक्त परिमंडळ-२, वसई, श्रीमती पद्मजा बढे, सहाय्यक पोलीस आयुक्त, वसई विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली नायगाव पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी/अंमलदार व गुन्हे शाखा कक्ष-३ चे अधिकारी/अंमलदार यांनी केली आहे.

--------------ooooo--------------